# भाजपचा विजयी चौकार; देशभर जल्लोष

शुक्रवार, ११ मार्च २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २३३
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## चारही राज्यांत सर्व पक्षांना दूर सारून एकहाती सत्ता



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल गुरुवारी (दि. १०) लागले. उत्तर प्रदेश, गोवा, पंजाब, उत्तराखंड आणि मणिपूरमध्ये सत्तेची सेमिफायनल भाजपने जिंकली आहे. पाच पैकी चार राज्यात भाजपने आपला करिष्मा कायम ठेवलाय. निकालानंतर देशभर भाजप समर्थकांनी आनंद व्यक्त करत जल्लोष केला आहे. देशातील सर्वात मोठे राज्य असलेल्या युपीत भाजपने पुन्हा विजय मिळवला आहे. गोवा, उत्तराखंड, मणिपूरमध्येही भाजपचा दबदबा कायम आहे. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने बहुमत मिळविले आहे.**

उत्तर प्रदेश, पंजाब, मणिपूर, उत्तराखंड आणि गोवा या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीच्या निकालात चार राज्यांत भाजपला बहुमत मिळाले. उत्तर प्रदेश, गोवा, उत्तराखंड आणि मणिपूर येथे भाजपला मिळालेल्या यशानंतर दिल्लीत भाजपच्या मुख्यालयातून पंतप्रधान मोदी यांनी भाषण केले.

या वेळी गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची उपस्थिती होती. पंतप्रधान मोदी या वेळी म्हणाले की, मी भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांची पूर्णपणे प्रशंसा करेल, ज्यांनी दिवस-रात्र न पाहता या निवडणुकीत कठोर परिश्रम केले. आपले कार्यकर्ते जनतेचं मन, त्यांचा विश्वास जिंकण्यात यशस्वी ठरले. याचबरोबर संपूर्ण पक्षाचे नेतृत्व ज्यांनी केले, कार्यकर्त्यांना सातत्याने मार्गदर्शन केले असे आमचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचेदेखील अभिनंदन करतो. **दरम्यान निकाल प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.**

**आज उत्साहाचा, उत्सवाचा दिवस आहे. हा उत्सव भारताच्या लोकशाहीसाठी आहे. आज निवडणुकीचे निकाल पाहताना माझे स्वप्न सत्यात उतरल्याचा आनंद आहे. सर्व मतदारांना खूप खूप शुभेच्छा. भाजपच्या या बंपर विजयात तुम्हा सर्वांचा हातभार आहे.**
**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




### ■ उत्तर प्रदेशमध्ये पुन्हा ‘कमळ’ फुलले

सर्वांत मोठी लढाई उत्तर प्रदेशची होती. जी भाजपने जिंकलेली आहे. उत्तर प्रदेशच्या जनतेने भाजपला स्पष्ट बहुमत दिले आहे. भाजप २७४ जागी आघाडीवर तर समाजवादी पक्षाला १२४ जागांवर समाधान मानावे लागलेय. तिकडे बसपा तिसऱ्या स्थानी तर काँग्रेस चौथ्या स्थानी पोहचले. भाजपने २७२ जागांवर आघाडी मिळवत विरोधकांना आस्मान दाखवलं आहे. २०१७ नंतर पुन्हा २०२२ मध्ये सलग दुसऱ्यांदा निर्विवाद बहुमत मिळवणाऱ्या भाजपचा विजय ऐतिहासिक ठरला आहे.

### ■ गोव्यात सलग दुसऱ्यांदा भाजपकडे सत्ता

गोव्यात भाजप सलग दुसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार हे आता स्पष्ट झालेय. गोव्यात भाजप २० जागांवर आघाडीवर आहे. गोव्यात भाजपचा सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झालाय, कारण तीन अपक्ष विजयी उमेदवारांनी भाजपला समर्थन दिलेय. अतिरिक्त संख्याबळासाठी महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाशी भाजपची बोलणीही सुरू केलीय. त्यामुळे आता भाजप राज्यपालांना भेटून सत्तास्थापनेचा दावा करणार आहे. गोव्यात १४ मार्च रोजी शपथविधी सोहळा पार पडणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.




### उत्तराखंडमध्ये भाजपची सर्व पक्षांना धोबीपछाड

उत्तराखंडमध्ये भाजपने एकूण ७० जागांपैकी सर्व पक्षांना मागे सोडत ४७ जागांवर सर्वांत मोठी आघाडी घेतली आहे. तर काँग्रेस १९ जागा मिळाल्या आहे. उत्तराखंडमध्ये आम आदमी पक्षाला खातेही उघडता आले नसून इतर पक्ष चार जागांवर आघाडीवर आहेत.

### पंजाबमध्ये काँग्रेसचा सुपडा साफ; आप विजयी

पंजाब विधानसभा निवडणुकीच्या निकालामध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्ष विजयी झाला आहे. आप पक्षाने पंजाबमध्ये सत्ताधारी काँग्रेसचा सुपडा साफ केला आहे. पंजाबमधील जनतेने आप पक्षाच्या बाजूने कौल दिला आहे. पंजाबमध्ये ९२ जागांवर आप आले आहे.

**सकारात्मक मतांवर भाजप निवडून आलेली आहे. मला विश्वास आहे गोव्यात एक चांगले सरकार आम्ही स्थापन करू. मी पहिल्या दिवशीच हे सांगितले होते की, शिवसेनेची लढाई ही आमच्याशी नाहीए ती लढाई नोटाशी आहे. आपण जर पाहिलं तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना युती होती, या दोघांची एकत्रित मते जरी बघितली तरी नोटा पेक्षा ती कमी आहेत.**
**-देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते**

### पंतप्रधान मोदींचा आज गुजरातमध्ये रोड शो

पंतप्रधान मोदी या निवडणुकांच्या निकालानंतर शुक्रवारी (दि. ११) दोन दिवसांसाठी गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. ते पंचायत सदस्यांच्या सभेला संबोधित करणार असून अहमदाबाद एअरपोर्ट ते पक्षाच्या मुख्य कार्यालयापर्यंत रोड शोदेखील काढणार आहेत. त्यांच्यासोबत गृहमंत्री अमित शहादेखील उपस्थित असतील, असे प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील यांनी सांगितले.

### मणिपूरमध्ये भाजपला बहुमत

मणिपूरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या ६० जागांसाठीचे बहुतेक निकाल हाती आले असून यामध्ये भाजपने एकहाती सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकले आहे. भाजप उमेदवार आतापर्यंत ६० पैकी ३२ जागी विजयी झाले आहेत. तर काँग्रेस पाच, एनपीपी सात, एनपीएफ पाच इतर ११ जागांवर आघाडीवर आहेत.



**पनवेल :** पाचपैकी चार राज्यांत भाजपने बहुमत मिळविले. उत्तर प्रदेश, गोवा, मणिपूर, उत्तराखंड, विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने देदिप्यमान कामगिरी करत बहुमत प्राप्त केले. त्याबद्दल भाजपच्या मध्यवर्ती कार्यालय येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली फटाक्यांची आतषबाजी आणि मिठाई वाटून जल्लोष करण्यात आला.

### ‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भाजपचा विजय’

**मुंबई :** उत्तर प्रदेश, गोवा, उत्तराखंड आणि मणिपूर विधानसभा निवडणुकीत भाजपला विजय मिळाल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या नेते व कार्यकर्त्यांनी मुंबईत प्रदेश कार्यालयात प्रचंड जल्लोष केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भाजपला यश मिळाले आहे, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. गोवा विधानसभा निवडणुकीतील यशाबद्दल भाजपचे गोवा निवडणूक प्रभारी आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चंद्रकांत पाटील यांनी या वेळी विशेष अभिनंदन केले.



**उरण : भाजपच्या विजयाचा जल्लोष आमदार महेश बालदी यांच्या कार्यालयाजवळ कार्यकर्त्यांनी केला. या वेळी तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

### काँग्रेसने आत्मपरीक्षण केले पाहिजे -खा. शरद पवार

**मुंबई : प्रतिनिधी**

पंजाब विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने सत्ताधारी काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनी काँग्रेस पक्षासंदर्भात महत्त्वपूर्ण निरीक्षण मांडले आहे.

काँग्रेस पक्षाचा १९७७ साली यापेक्षा वाईट पद्धतीने पराभव झाला होता. काँग्रेसच्या नेतृत्त्वाने आणि जमिनीवरील कार्यकर्त्यांनी आपण कुठे कमी पडलो, कुठे एकत्र येण्याची गरज होती आणि कोणत्या गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे होते, याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. काँग्रेसच्या नेतृत्वाने आणि कार्यकर्त्यांनी संघटना मजबूत करून लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी दाखवली तर जनता तुम्हाला पुन्हा स्वीकारेल, असे, मत खासदार शरद पवार यांनी व्यक्त केले. विधानसभा निवडणुकांच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर खासदार पवार मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

## निवडक

### सफाई करताना टँकमध्ये पडून तीन कामगारांचा मृत्यू

**मुंबई :** सफाईचे काम करताना तीन कामगार सेप्टिक टँकमध्ये पडल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्या तीनही कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. कांदिवलीमधील एकता नगरमध्ये ही दुर्घटना घडली. दरम्यान, कामगारांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे.

### शेअर बाजार सलग तिसऱ्या दिवशी तेजीत

**मुंबई :** शेअर बाजारात गुरुवारी सलग तिसऱ्या दिवशी तेजी दिसून आली. मेटल, एफएमसीजी, रियल्टी शेअर्समध्ये खरेदी दिसून आली. आज बँकिंग, ऑटो शेअर्समध्येही खरेदी होती. स्मॉल-मिड कॅप शेअर्समध्येही तेजी दिसून आली. गुरुवारच्या व्यापारात भारतीय शेअर बाजाराचे मार्केट कॅप ३.१६६७४ ट्रिलियन डॉलरवर पोहचले आहे, तर ब्रिटीश बाजाराचे मार्केट कॅप ३.११०२ ट्रिलियन डॉलर आहे.

## युक्रेनहून रायगडातील ३१ विद्यार्थी परतले




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ३२ विद्यार्थीं युक्रेनमध्ये अडकलेले होते. यातील ३१ विद्यार्थी रायगडात परतले असून, उर्वरीत एक विद्यार्थीही परतीच्या मार्गावर आहे. तो पोलंडमध्ये दाखल झाला आहे.

जिल्ह्यातील ३२ विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी युक्रेनला गेले होते. रशियन फौजांच्या आक्रमणामुळे हे सर्व विद्यार्थी युक्रेनमधील अडकून पडले. युक्रेनमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना भारतात परत आणण्यासाठी ऑपरेशन गंगा सुरू करण्यात आले होते. यासाठी युक्रेन लगत असलेल्या रोमानिया, पोलंड देशात दररोज खास विमाने पाठविली जात होती.

युद्धपरिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना युक्रेनमधून बाहेर पडणे मुश्कील झाले होते. मिळेल त्या वाहनाने त्यांना सिमेवर दाखल होण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. खार्कीव आणि सुमी या परिसरातील विद्यार्थ्यांची सर्वाधिक कोंडी झाली होती. अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी अखेर सिमाभाग गाठला. यासाठी काही मुलांनी तर चाळीस ते पन्नास किलोमीटरची पायपीटही केली होती.

दरम्यान, जिल्ह्यातील ३२ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थी हे आता सुखरुप घरी परतले होते. पेण येथील कल्पित सुधीर मढवी हा विद्यार्थी सुमी शहरात अडकून पडला होता. तोदेखील आता पोलंड मध्ये सुखरूप दाखल झाला आहे. त्यामुळे लवकरच तो भारतात परतेल अशी अपेक्षा आहे.

## राज्यात पुन्हा अवकाळी पावसाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

मागच्या दोन दिवसांत कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यात गारपीट आणि वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने शेतकरी आणि बागायतदारांचे अतोनात नुकसान झाले आहे. काढणीला आलेली द्राक्ष आणि आंब्याचे मोठे नुकसान झाल्याने बागायदार हवालदील झाले आहेत. आता हवामान विभागाने पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे.

पुढील पाच दिवसांत केरळ, माहेमध्ये हलका पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. तर महाराष्ट्रात कोकण गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे उष्णता कमालीची वाढत असून ३८ डिग्रीपर्यंत तापमान वाढण्याची शक्यता आहे. यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

## कोळी बांधवांसाठी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांचा पुढाकार

### मच्छीमारांच्या प्रश्नावर विधानसभेत उठविला आवाज

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे मच्छीमारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून मच्छीमारांच्या हितासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधत आवाज उठविला आहे.

राज्यात जवळपास ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला कोळी समाज आपल्या उपजिविकेसाठी पारंपरिक मत्स्य व्यवसायावर अवलंबून आहे. पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे कोळी समाजाला आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले असून शासनाच्या बंदीमुळे पर्ससीन जाळ्याद्वारे मच्छीमारी करणाऱ्या कोळी बांधवांच्या पारंपारिक




मत्स्य व्यवसायात अडचणी आल्यामुळे कोळी बांधवांमध्ये असंतोष पसरला आहे. या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोळी बांधवांना आपला पारंपरिक मच्छीमारी व्यवसाय धोक्यात येऊ नये म्हणून पर्ससीन जाळ्याद्वारे मच्छीमारी करण्यासाठी घातलेली बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे मत्स्यविकास मंत्री अस्लम शेख यांनी लेखी स्वरूपात दिलेल्या उत्तरात म्हटले की, पारंपरिक मच्छीमारांचे हित जतन करण्यासाठी राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन जाळ्याद्वारे करण्यात येणाऱ्या मासेमारीचा अभ्यास करण्यासाठी ९ सप्टेंबर २०११ नुसार डॉ. व्ही. एस. सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात ५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन केले आहे. या शासन आदेशामधील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन सप्टेंबर ते डिसेंबर या चार महिन्यांच्या कालावधीतच राज्याच्या जलधी क्षेत्रात मासेमारीस परवानगी दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ९३२७/२०१६ च्या अनुषंगाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन आदेश ७ डिसेंबर २०२० नुसार समिती गठीत केली आहे. या समितीचा अहवाल सादर केल्यानंतर मा. मंत्री मंडळाच्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

# मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा द्यावा

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची शासनाकडे मागणी

### तारांकित प्रश्नाद्वारे वेधले शासनाचे लक्ष




**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील १६० मच्छीमार सहकारी संस्थामधील ९,६४६ यांत्रिकी नौकांना शासनाकडून मंजूर करण्यात येत असलेल्या डिझेल कोट्यामधील खर्चाच्या परताव्याची १८६ कोटी थकीत रक्कम मच्छिमारांना उपलब्ध करून दिली नसल्याचे निदर्शनास असून त्यांना तसेच रायगड जिल्ह्यातील मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा मिळावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी विधानसभेच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून मागणी केली आहे.

राज्यातील १६० मच्छीमार सहकारी संस्थामधील ९,६४६ यांत्रिकी नौकांना शासनाकडून मंजूर करण्यात येत असलेल्या डिझेल कोट्यामधील खर्चाच्या परताव्याची १८६ कोटी थकीत रक्कम मच्छिमारांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे. २०१७ पासून डिझेल परताव्याची रक्कम जवळपास ४८ कोटी रुपयांपेक्षा जास्त असताना रायगड जिल्ह्यातील मच्छीमार संस्थांना केवळ दोन कोटी रुपये वितरीत करण्यात आले. तसेच शासनाने २०२०-२१ या कालावधीत मंजूर केलेल्या ६० कोटी रुपयांपैकी १८ कोटी रुपये निधी नोव्हेंबर, २०२१ मध्ये अथवा त्या दरम्यान मच्छीमार संस्थांना अदा केले.

रायगड जिल्ह्यातील मच्छीमार संस्थांनी डिझेल परताव्याची प्रकरणे सहाय्यक मत्स्य व्यवसाय अधिकारी यांच्याकडे सादर करून बराच कालावधी होऊनसुद्धा डिझेल परतावा न मिळाल्यामुळे तसेच निसर्ग वादळ, कोरोना संकट, तौक्ते वादळ या सर्व संकटांमुळे मच्छिमारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून मच्छिमारांना नुकसान भरपाई तसेच १०० टक्के डिझेल परतावा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे मत्स्यविकास मंत्री अस्लम शेख यांनी यावर सांगितले की, डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्ती योजनेंतर्गत २०२१-२०२२ (दि. ३१ जानेवारीअखेर) पर्यंत सात सागरी जिल्ह्यातील १९७० मच्छीमार सहकारी संस्थांचे २५३.९७ कोटी रुपये इतक्या रकमेचे प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडे निधी अभावी प्रलंबित आहेत. योजनेअंतर्गत २०१७-१८ पासून जानेवारी २०२२ अखेर रायगड जिल्ह्यास ४२.०१ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. २०२०-२१ मध्ये रु. ५९.९९ कोटी इतका निधी सर्व सागरी जिल्ह्यांना वितरीत करण्यास आला असून, त्यापैकी रायगड जिल्ह्यास १२.३० कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला. निसर्ग चक्रीवादळात बाधित झालेल्या मच्छिमारांसाठी शासनाने २४ जून, २०२० अन्वये विशेष बाब म्हणून वाढीव अर्थसहाय्य मंजूर केले आहे. त्यानुसार रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील बाधित मच्छिमारांना महसूल विभागाकडून १३६.७० लक्ष रुपये वाटप करण्यात आले आहेत. त्यामध्ये रायगड जिल्ह्यासाठी ९३.१६ लक्ष रुपयांचा समावेश आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये मासेमारीवर अथवा मासे विक्रीवर कोणाताही परिणाम होऊ नये यासाठी शेतमालाच्या अनुषंगाने योग्य ती सूट देण्यात आली होती. तसेच डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्ती योजनेंतर्गत २०२१-२२ या वर्षाकरीता अर्थसंकल्पित निधी ६० कोटी रुपये वितरित करण्यात आला असून हिवाळी अधिवेशनामध्ये पुरक मागणीद्वारे मंजूर ५० कोटी रुपये निधी वितरीत करण्याच्या अनुषंगाने विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.





**पनवेल : जागतिक महिला दिनानिमित्त प्रसाद म्हात्रे पटेल पार्क मित्रपरिवार, नगरसेवक नितीन पाटील आणि भाजप ओबीसी शहर सरचिटणीस प्रसाद म्हात्रे यांच्यावतीने महिलांसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रम बुधवारी उत्साहात पार पडला. या वेळी पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस अमरीश मोकल, अर्चना परेश ठाकूर, माजी नगरसेविका निता माळी, युवानेते केदार भगत, शहर संयोजक प्रसाद हनुमंते, नीता मंजुळे, प्रवीण सावळेकर, सुलोचना म्हात्रे यांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला उपस्थित होत्या.**

## खांदा कॉलनीत बांधले अनधिकृत मंदिर

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील खांदा कॉलनीत सेक्टर ९ मध्ये शिवसेना शाखेच्या बाजूला दोन दिवसांच्या सुटीचा फायदा घेऊन अनधिकृत मंदिर बांधल्याची तक्रार नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे केली आहे.

खांदा कॉलनीत सेक्टर ९ मध्ये रेल्वे लाईनलगत शिवसेना शाखेचे कार्यालय आहे. या कार्यालयाच्या बाजूला शनिवार-रविवार सुटीच्या दिवशी कोणाच्या लक्षात येऊ नये म्हणून ताडपत्री लावून मंदिर उभारण्यात आले. याबाबत माहिती मिळताच, नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी त्याठिकाणी जाऊन खात्री केली. त्यानंतर महापालिका प्रभाग अधिकारी, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त गावडे, महापौर डॉ. कविता चौतमोल व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे लेखी तक्रार केली.

एकनाथ गायकवाड यांनी आपल्या पत्रात शहरात अशी अनेक अनधिकृत बांधकामे असून अतिक्रमण विभागाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने ही अनधिकृत बांधकामे होत आहेत. यापुढे ती होऊ नयेत, यासाठी अशा बांधकामांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.



## सिडको नोडमध्ये पाणीपुरवठा दोन दिवस बंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातर्फे हाती घेण्यात येणाऱ्या तातडीच्या दुरुस्तीच्या कामांमुळे कळंबोली, नवीन पनवेल, काळुंद्रे आणि करंजाडे नोडमधील पाणी पुरवठा शुक्रवार ११ मार्च रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते १२ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा कमी दाबाने होईल. संबंधित नोडमधील नागरिकांनी पाणी साठवण्याची योग्य ती व्यवस्था करावी व सदर कालावधी दरम्यान पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.


**नोकरीविषयक**

**लेडिज ऑफीस असिस्टंट पाहिजे.**
- **कॉम्प्युटर टाईपिंग आवश्यक.**
- **पनवेल क्षेत्रात**

**-: संपर्कासाठी नंबर :-**
**९६३७१६३९१९**
E-mail : ruchakul24@gmail.com

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works under EHV Testing. Dn., Panvel

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Amount in Rs. | EMD in Rs. | Tender fee in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 2 | **EE/EHV/T.DN./PNL/ TECH/Ten - 2/2022-23 RFX no. – 7000022523** | Hiring of Light Motor Vehicle – 1 for Testing batches at EHV Testing Division, Panvel. | 5,99,984/- | 6000/- | 500/- + GST |
| 3 | **EE/EHV/T.DN./PNL/ TECH/Ten - 5/2022-2023 RFX no. – 7000022524** | Hiring of Light Motor Vehicle – 4 for Testing batches at EHV Testing Division, Panvel. | 5,99,984/- | 6000/- | 500/- + GST |
| 5 | **EE/EHV/T.DN./PNL/TECH/ Enquiry-6/2022-2023 RFX no. – 7000022525** | Hiring of Light Motor Vehicle for Kandalgaon Testing unit under EHV Testing Division, Panvel. | 5,99,984/- | 6000/- | 500/- + GST |

**Submission of bids from 10.03.2022 to 17.03.2022 up to 23.59hrs, Bid opening date and time:- 18.03.2022 at 10:00 hrs (Technical) and at 11:00 hrs (Commercial) if possible.**

**For further details visit our Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in**

**Contact person: The Executive Engineer -9930667505**
**The Dy. Executive Engineer (O) - 9619499485**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV Testing. Dn., Panvel**

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, जि. ठाणे**
धुमाळ रेसिडेंसी, बिजांकुर हॉस्पिटल जवळ, किन्हवली रोड, गोठेघर, ता. शहापूर, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२५२७-२७२१५७/७७५७८०३१५७ ईमेल - poitdp.shahapur-mh@gov.in

जा.क्रं.शाआशा २०२२ ई-निविदा/सं.प्र./प्र.क्र./का.४(५)/ दिनांक- १०.०३.२०२२

**शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना (MS-CIT) संगणक प्रशिक्षण देणे**

**जाहीर ऑनलाईन ई-निविदा सूचना सन २०२१-२२**

शासकीय व निमशासकीय नोकरींसाठी (MS-CIT) प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आलेले आहे, त्यामुळे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर अंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता ९ वी व ११ वी या वर्गातील विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाची जागरुकता, साक्षरता, उपयोगिता आणि कार्यक्षमतेसाठी (MS-CIT) संगणक प्रशिक्षण देण्यासाठी इच्छुक स्वयंसेवी संस्था, प्रोप्रायटर फर्म यांचेकडून ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

ई-निविदेच्या संपूर्ण माहितीसाठी रुपये १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार)ची ना-परतावा रक्कम ऑनलाईन भरुन ई- निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल. ई-निविदा भरताना बाजारभावाचा व बाजारातील किंमतीच्या चढ-उताराचा सर्वकष विचार करुन वाजवी दर भरण्यात यावेत. सदर ई-निविदा पूर्णत: अथवा अंशत: स्विकारणे वा नाकारणे किंवा पुन्हा मागविणे, वा निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणे, या बाबतचे सर्वाधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर, ता. शहापूर, जि. ठाणे यांनी राखून ठेवलेले आहेत. निविदाविषयक सुचनांसाठी निविदा दस्ताऐवज, अधिक माहितीसाठी, निविदा भरण्यासाठी तसेच निविदा विषयक तांत्रिक अडचणींसाठी इच्छुक निविदाधारकांनी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. सदर निविदा वेळापत्रक खालीलप्रमाणे राहिल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदा फार्म डाऊनलोड करणे तसेच निविदा तयार करणे | :- | दि. १४/०३/२०२२ ते दि. २८/०३/२०२२ |
| २. | निविदा सादर करणे (Bid Submission) | :- | दि. १४/०३/२०२२ ते दि. २८/०३/२०२२ |
| ३. | निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | :- | दि. २९/०३/२०२२ ते दि. ३०/०३/२०२२ |

**सही/-**
**(श्रीम. आर. एच. किल्लेदार)**
**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**
**शहापूर, ता. शहापूर**

**विमाका/कोवि/२०२१-२०२२/३५१**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M )/DIVN/MHD/ Tech/Tender-09/ 2021-22 Dtd.11.03.2022 RFX No.7000022505** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for providing Hiring of MMV (e.g. Bolero Pickup, Tata Shakti Pickup, TATA 407) for KTL Camp Kandalgaon under KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn.Mahad for the year 2022-23 | **Rs. up to 5,29,420/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/- plus GST+1% Labour CESS.

Bid submission is from **11.03.2022 @ 00:00 Hrs to 20.03.2022 @ 23:59 Hrs** for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:** - The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M )/DIVN/MHD/ Tech/Tender-07/ 2021-22 Dtd.11.03.2022 RFX No. 7000022503** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for the providing light Motor Vehicle Jeep Type ( i.e. Xylo, Mahindra Bolero/TUV, Sumo Gold etc) services along with fuel and driver at KTL S/Dn.Mahad under EHV (O&M) Division Mahad For the Year 2022-23. | **Rs. up to 5,37,229/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5000/- whichever is the highest & tender fee will be the Rs. 500/- plus GST+1% Labour CESS.

Bid submission is from **11.03.2022 @ 00:00 hrs to 20.03.2022 @ 23:59 Hrs** for above tender for further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person: -** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No :- EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Tender-03/2021-22 Dtd. 11.03.2022 RFX No. 7000022526** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for the providing light Motor Vehicle Jeep Type ( i.e. Xylo, Mahindra Bolero/TUV, Sumo Gold etc) services along with fuel and driver at 100 kV Mhasala S/s under EHV (O&M) Division Mahad For the Year 2022-23. | **Rs. up to 5,37,229/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 11.03.2022 @ 00:00 hrs. to 20.03.2022 @ 23:59 Hrs. for above tender for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O & M)/ DIVN/MHD/Tech/ Tender-08/2021-22 Dtd. 11.03.2022 RFX No. 7000022504** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for providing Hiring of MMV (e.g. Bolero Pickup, Tata Shakti Pickup, TATA 407) for KTL Camp Mahad under KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn.Mahad for the year 2022-23 | **Rs. up to 5,29,420/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 11.03.2022 @ 00:00 hrs to 20.03.2022 @23:59Hrs for above tender for further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(भूखंड क्र. ३९, सेक्टर क्र. ८, क्षेत्र - ४५०.०० चौ. मी. या भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा करण्याबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या २२.५ % टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मौजे-पारगांव, निवाडा युनिट केस क्र. ६०, मधील सर्व्हे क्र. ३२/४ ही जमीन खातेदार वत्सला जनार्धन गायकवाड व कुसूम मारुती गायकवाड यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील भूखंड क्र. ९६, सेक्टर क्र. ८, क्षेत्र ८५०.०० चौ. मी. या भूखंडाचे वाटपपत्र देण्यात आले आहे.

आता निवाड्यातील खातेदार वत्सला जनार्धन गायकवाड व कुसूम मारुती गायकवाड यांनी त्यांना वाटपित झालेला पुष्पक नोड येथील भूखंड क्र.९६, सेक्टर क्र. ८, क्षेत्र ८५०.०० चौ. मी. या भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा करणेकरीता अर्ज सादर केला आहे. परंतु मौजे- पारगांव, निवाडा युनिट केस क्र. ६०, मधील सर्व्हे क्र. ३२/४ या सर्व्हे क्रमाकांचा निवाडा वत्सला जनार्धन गायकवाड व कुसूम मारुती गायकवाड यांचे नावे जाहीर झाला तसेच ७/१२ सदरी वत्सला जनार्धन गायकवाड व कुसूम मारुती गायकवाड, दत्तात्रय लक्ष्मण कांबळे, सिता लक्ष्मण कांबळे यांची नावे आहेत. परंतु दत्तात्रय लक्ष्मण कांबळे हा ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून हरवलेली होती. सदर निवाडाधारक यांनी भाऊ दत्तात्रय लक्ष्मण कांबळे हा ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून हरवलेली आहे. म्हणून मयत घोषित करुन मिळणेकरिता आर. सी. एस. क्र. १४१/२००९ दावा दाखल केला होता.

सदर आर. सी. एस. क्र. १४१/२००९ दाव्यामध्ये तळोजा पोलिस स्टेशन (नवी मुंबई) जि. रायगड येथील मानव मिसिंग रजिस्टर क्र. ९/१९९८, दि. १८.१०.१९९८ अन्वये मिसिंग तक्रार दिल्याचे नमुद केले आहे. तद्नंतर निवाडाधारक यांचे भाऊ दत्तात्रय लक्ष्मण कांबळे हे सात वर्षापेक्षा हरवलेली व्यक्ती मिळून न आल्याने मयत घोषित केले आहे.

| अ नु. क्रमांक | गावाचे नाव | ७/१२ सदरी असलेले खातेदारांचे गाव | निवाड्यातील व वाटपपत्रातील तसेच ज्यांचे नावे भाडेपट्टा करारनामा करणाऱ्यांचे नाव |
|---|---|---|---|
| | | (I) | (ii) |
| | मौजे-पारगाव, निवाडा युनिट केस क्र. ६०, मधिल सर्व्हे क्र.३२/४ | वत्सला जनार्धन गायकवाड, कुसूम मारुती गायकवाड, दत्तात्रय लक्ष्मण कांबळे, सिता लक्ष्मण कांबळे | वत्सला जनार्धन गायकवाड, कुसूम मारुती गायकवाड |

तरी उपरोक्त निवाड्यानुसार व वाटपपत्रानुसार सिडकोकडे फक्त वरील टेबल क्र.(ii) मध्ये नमूद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. तरी या व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया संदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर ४००६१४, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत तसेच वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजनेअंतर्गत सिडकोद्वारे पुढील कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**
**तळ मजला, सिडको भवन, सी. बी. डी.**
**बेलापूर ४००६१४ नवी मुंबई**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/४५५/२०२१-२२

## जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून

## भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रमाणे कलम १९ चे घोषणापत्र.

क्रमांक भूसंपादन कात–५/तळीये/घोषणापत्र/एस आर ०९/२०२१.– ज्याअर्थी, दरडग्रस्तांचे पुनर्वसन या सार्वजनिक प्रयोजनाकरिता मौजे तळीये, ता. महाड, जि. रायगड येथील जमिन संपादीत करावयाची आहे. सदर संपादनासाठी केलेली जमिन उप विभागीय अधिकारी महाड, उप विभाग महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उप विभागीय अधिकारी, महाड यांनी अधिसूचना, क्रमांक भूसंपादन /कात–५/तळीये/एस आर ०९/२०२१, दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ अन्वये कलम ११ ची अधिसूचना मराठीमध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचनेबाबतचे यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, रायगड–अलिबाग, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे. आणि म्हणून, उक्त अधिनियमांच्या कलम १९च्या पोट–कलम (१)च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनसूची तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वासाहतीच्या प्रयोजनासाठी निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उप विभागीय अधिकारी महाड, उप विभाग महाड, ता. महाड, जि. रायगड यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी. असे निर्देश देण्यात येत आहे.

**अनुसूची एक**
**जमिनीचे वर्णन**

गाव – तळीये | तालुका – महाड | जिल्हा – रायगड

| अ.क्र. (१) | गट/सर्व्हे क्रमांक (२) | संपादनाकरिता आवश्यक जमिनीचे आदनामे क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | १०६/१ | ०–१२–९० |
| २ | १०६/२ | ०–१०–४० |
| ३ | १०७/१ | ०–०२–३ |
| ४ | १०७/२ | ०–०१–० |
| ५ | १०७/३ | ०–०१–८ |
| ६ | १०७/४ | ०–०२–५ |
| ७ | १०७/५ | ०–००–५ |
| ८ | ११९/१० | ०–५३–१० |
| ९ | ११९/१३ | १–३७–० |
| १० | ११९/१४ | ०–१४–० |
| ११ | ११९/१५ | ०–१६–० |
| १२ | ११९/१६ | ०–२०–०० |
| १३ | ११९/१७ | ०–३९–०० |
| १४ | ११९/१८ | ०–१७–० |
| १५ | ११९/१९ | ०–२२–० |
| १६ | ११९/२० | ०–३६–० |
| १७ | ११९/२१ | ०–४७–१ |
| १८ | ११९/२२ | ०–९४–१ |
| १९ | ११९/२३ | ०–१५–० |
| २० | ११९/२५ | ०–८२–१० |
| २१ | ११९/२६ | ०–५६–१० |
| २२ | ११९/२७ | ०–४६–१० |
| २३ | ११९/२८ | ०–५५–१ |
| २४ | १२०/१ | ०–९८–० |
| २५ | १२०/२ | १–२७–० |
| २६ | १२०/३ | ०–७८–० |
| २७ | १२०/४ | ०–४९–० |
| २८ | १२०/५ | ०–६५–० |
| २९ | १२०/६ | ०–३८–० |
| ३० | १२०/७ | ०–६३–० |
| ३१ | १२०/८ | १–०२–०० |
| ३२ | १२०/९ | ०–०८–० |
| ३३ | १२०/१० | ०–२४–० |
| ३४ | १२१/३१ | ०–२३–०० |
| ३५ | १२१/६ | ०–१७–०० |
| ३६ | १२१/७ | ०–२२–१० |
| ३७ | १२१/८ | ०–१७–०० |
| ३८ | १२१/९ | ०–२२–० |
| ३९ | १२१/१६ब | ०–५१–६ |
| ४० | १२१/१७ | ०–८९–० |
| ४१ | १२२/२ | ०–२५–० |
| ४२ | १२२/१३ | ०–३९–० |
| | **एकूण** | **१७.३८.८०** |

**अनुसूची दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :–** मौजे तळीये, ता. महाड येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन.

**प्रकल्पकार्याचे वर्णन :–** दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे तळीये, तालुका महाड येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मौजे तळीये येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी तळीये येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वयंसेवी संस्था मार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :–**

दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे तळीये, तालुका महाड येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मौजे तळीये येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी तळीये येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वंयसेवी संस्था मार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे. आणि दरडग्रस्तांना त्याचा लाभ होणार आहे.

**अनुसूची तीन**
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

गाव – तळीये | तालुका – महाड | जिल्हा – रायगड

| अ.क्र. (१) | गट/सर्व्हे क्रमांक (२) | संपादनाकरिता आवश्यक जमिनीचे आदनामे क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | १०६/१ | ०–१२–९० |
| २ | १०६/२ | ०–१०–४० |
| ३ | १०७/१ | ०–०२–३ |
| ४ | १०७/२ | ०–०१–० |
| ५ | १०७/३ | ०–०१–८ |
| ६ | १०७/४ | ०–०२–५ |
| ७ | १०७/५ | ०–००–५ |
| ८ | ११९/१० | ०–५३–१० |
| ९ | ११९/१३ | १–३७–० |
| १० | ११९/१४ | ०–१४–० |
| ११ | ११९/१५ | ०–१६–० |
| १२ | ११९/१६ | ०–२०–०० |
| १३ | ११९/१७ | ०–३९–०० |
| १४ | ११९/१८ | ०–१७–० |
| १५ | ११९/१९ | ०–२२–० |
| १६ | ११९/२० | ०–३६–० |
| १७ | ११९/२१ | ०–४७–१ |
| १८ | ११९/२२ | ०–९४–१ |
| १९ | ११९/२३ | ०–१५–० |
| २० | ११९/२५ | ०–८२–१० |
| २१ | ११९/२६ | ०–५६–१० |
| २२ | ११९/२७ | ०–४६–१० |
| २३ | ११९/२८ | ०–५५–१ |
| २४ | १२०/१ | ०–९८–० |
| २५ | १२०/२ | १–२७–० |
| २६ | १२०/३ | ०–७८–० |
| २७ | १२०/४ | ०–४९–० |
| २८ | १२०/५ | ०–६५–० |
| २९ | १२०/६ | ०–३८–० |
| ३० | १२०/७ | ०–६३–० |
| ३१ | १२०/८ | १–०२–०० |
| ३२ | १२०/९ | ०–०८–० |
| ३३ | १२०/१० | ०–२४–० |
| ३४ | १२१/३१ | ०–२३–०० |
| ३५ | १२१/६ | ०–१७–०० |
| ३६ | १२१/७ | ०–२२–१० |
| ३७ | १२१/८ | ०–१७–०० |
| ३८ | १२१/९ | ०–२२–० |
| ३९ | १२१/१६ब | ०–५१–६ |
| ४० | १२१/१७ | ०–८९–० |
| ४१ | १२२/२ | ०–२५–० |
| ४२ | १२२/१३ | ०–३९–० |
| | **एकूण** | **१७.३८.८०** |

**अनुसूची चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

दरडग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यास त्यांना त्याचा दिलासा मिळणार आहे.

**टिप :–** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उप विभागीय अधिकारी महाड, उप विभाग महाड, जि. रायगड यांचे व तहसिलदार, महाड जि. रायगड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

महाड,
दिनांक १७ जानेवारी २०२२.

**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
**जिल्हाधिकारी रायगड.**

## जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून

## भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रमाणे कलम १९ चे घोषणापत्र.

क्रमांक भूसंपादन कात–५/साखर/घोषणापत्र/एस आर १०/२०२१.– ज्याअर्थी, दरडग्रस्तांचे पुनर्वसन या सार्वजनिक प्रयोजनाकरिता मौजे साखर, ता. पोलादपूर, जि. रायगड येथील जमिन संपादीत करावयाची आहे. सदर संपादनासाठी केलेली जमिन उप विभागीय अधिकारी, महाड, उप विभाग, महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उप विभागीय अधिकारी, महाड यांनी अधिसूचना, क्रमांक भूसंपादन/कात–५/साखर/एसआर १०/२०२१ दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ अन्वये कलम ११ ची अधिसूचना मराठीमध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचनेबाबतचे यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची–दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, रायगड–अलिबाग, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे

आणि ज्याअर्थी, अनुसूची–तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन सारांश अनुसूची–चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उप विभागीय अधिकारी महाड, उप विभाग महाड, ता. महाड, जि. रायगड यांची नेमणुक करण्यात येत आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी असे निर्देश देण्यात येत आहे.

**अनुसूची – एक**
**जमिनीचे वर्णन**

गाव – साखर | तालुका – पोलादपूर | जिल्हा – रायगड

| अ.क्र. (१) | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर/गट नंबर (२) | संपादनाकरिता आवश्यक जमिनीचे आदनामे क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | ५४ब/४ | १.३४.०० |
| २ | ८८/४ | ०.११.०० |
| ३ | ८८/३ब | ०.१२.९१ |
| ४ | ८८/२ | ०.३१.६० |
| ५ | ८८/१ | ०.०१.५० |
| ६ | ९०/९ | ०.१६.०० |
| ७ | ९०/१० | ०.१०.४० |
| ८ | ८७/८ | ०.०४.०० |
| ९ | ८७/९ | ०.०४.०० |
| | **एकूण** | **२.२५.४१** |

पुढील मजकूर पान ५वर

## संपादकीय

# मोदी है तो मुमकिन है

उत्तर प्रदेशासह उत्तराखंड, मणिपूर आणि गोवा या अन्य तीन राज्यांमधील सत्ता राखत भारतीय जनता पक्षाने आपल्या शिरपेचामध्ये मानाचे अनेक तुरे रोवले आहेत. हा विजय अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि देशाच्या राजकारणाला वळण देणारा ठरणार आहे. या भरघोस यशानंतर महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकारच्या विरोधात भाजप नेत्यांनी सुरू केलेल्या संघर्षाला अधिकच धार येईल, यात शंका नाही.

**उत्तर प्रदेशामध्ये 'जो रामजी को लाये है, उन्ही को हम लायेंगे' या गाण्याचा गजर दीड-दोन महिने सुरू होता. तेथील जनतेने या गीताचे शब्द अक्षरश: खरे करून दाखवले. योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली सलग दुसऱ्यांदा दोन तृतीयांश बहुमत मिळवून भाजपने सत्तेचा गड राखला आहे. गेल्या ३७ वर्षांमध्ये उत्तर प्रदेशच्या इतिहासात असे घडले नव्हते. प्रस्थापितांविरोधी लाट, महागाईचा आगडोंब आणि शेतकरी आंदोलनातून उभा राहिलेला असंतोष अशी अनेक आव्हाने भाजपसमोर होती. निदान माध्यम-पंडितांचे तसे मत होते. उत्तर प्रदेशात कोणतेही सरकार पुन्हा निवडून सत्तेवर येत नाही हा तेथील साडेतीन दशकांचा रिवाजही मोडला गेला आहे. हा करिश्मा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कार्यकर्तृत्वाचा. सुशासन आणि गरीब कल्याणकारी योजना या दोन आघाड्यांवर योगी आदित्यनाथ यांचे सरकार गेली पाच वर्षे कार्यरत होते. ध्रुवीकरणाच्या राजकारणाचा आरोप भाजपवर नेहमीच केला जातो. पण त्यात तथ्य नाही हे देखील या निवडणुकीतून स्पष्ट झाले. वास्तविक अयोध्येतील राममंदिराचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर मंदिराच्या मुद्द्यावर मते मागणे भाजपला कठीण नव्हते. परंतु मोदी आणि त्यांच्या पक्ष सहकाऱ्यांनी राममंदिराच्या मुद्द्याचे प्रचार मोहिमेत भांडवल केले नाही. ज्या मंदिराचा शिलान्यास मोदी यांच्या हस्ते झाला, त्या मंदिराचे निर्माण हा खरे तर भाजपच्या हक्काचा भाग होता. परंतु, मोदी-योगी या डबल इंजिनच्या सरकारने विकासकामांवर अधिकाधिक भर दिला. कल्याणकारी योजनांवर सढळ हाताने खर्च केला. कायदा-सुव्यवस्था कर्तव्यकठोरपणे राखली. बेकायदा बांधकाम करणाऱ्यांची पळता भुई थोडी केली. म्हणूनच योगी आदित्यनाथ यांना उत्तर प्रदेशची जनता कौतुकाने 'बुलडोझर बाबा' असे म्हणू लागली. भाजपने आपल्याकडील चारही राज्यात सत्ता राखली असतानाच पंजाब हे आपल्या हातातील एकमेव राज्य काँग्रेसने गमावले. पंजाब काँग्रेसमधील दुफळी आणि केंद्रीय पातळीवरील नेतृत्वाची अकार्यक्षमता यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. अंतर्गत बेदिलीचा इतका फटका बसूनही काँग्रेस पक्ष सुधारेल असे वाटत नाही. कारण तशी सुधारणा करण्याची त्यांचीच इच्छा दिसत नाही. गोव्यामध्ये देखील भारतीय जनता पक्षाला कडवी टक्कर मिळेल, असे म्हटले जात होते. तृणमूल काँग्रेस आणि आम आदमी पक्षाच्या शिरकावामुळे गोव्यामध्ये काही काळ चुरशीचे वातावरण निर्माण झालेले दिसले खरे. परंतु अंतिमत: गेल्या वेळेपेक्षा अधिक जागा मिळवून भाजपनेच गड राखला. या निकालांचा आणखी एक स्पष्ट अर्थ म्हणजे पंतप्रधान मोदी यांची जनमानसावर असलेली मोहिनी अजूनही कायम आहे आणि गृहमंत्री अमित शहा यांचे कुशल निवडणूक व्यवस्थापन आजही भाजपला यशस्वी करत चालले आहे. 'उत्तर प्रदेश तो झांकी है, महाराष्ट्र अभी बाकी है', अशी घोषणा भाजपचे नेते आता देत आहेत, त्यात खूप अर्थ भरला आहे.**

# रायगड भूषण देताना चारित्र्य पडताळणी करा

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना रायगड जिल्हा परिषद 'रायगड भूषण' पुरस्कार देऊन गौरविते. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात जिल्हा आघाडीवर राहिला, तो येथील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींमुळे. अध्यात्मिक संप्रदायांचा जिल्हा म्हणून रायगड जिल्ह्याची जगभर ओळख निर्माण झाली आहे. अनेक व्यक्तींनी आपापल्या क्षेत्रात काम करुन जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यास हातभार लावला आहे. अशा व्यक्तींना रायगड जिल्हा परिषदेने रायगड भूषण पुरस्कारासाठी निवड करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर या मानाच्या व प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करताना त्या व्यक्तीच्या चारित्र्याची पडताळणीदेखील करून घेतली पाहिजे.

रायगड जिल्ह्यातील गुणवंतांचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी रायगड जिल्हा परिषदेने रायगड भुषण पुरस्कार देण्यास सुरूवात केली. मात्र जिल्हा परिषदेतील सत्ताधारी त्याचा वापर राजकीय सोय म्हणूनच करत आलेत. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ही खिरापत दरवर्षी वाटली जाते. लोकसभा निवडणुकीपूर्वी जिल्ह्यातील १५३ जणांना तर विधानसभा निवडणुकीपूर्वी १८७ जणांना रायगड भूषण चे वितरण करण्यात आले होते. अवघ्या तीन महिन्यात प्रसाद वाटावा तसे साडेतिनशे पुरस्कार वाटण्यात आले.

दरवर्षी वाढत जाणाऱ्या पुरस्कारांच्या संख्येबाबत प्रसार माध्यमे, समाज माध्यमे यावर जोरदार टीका होते. परंतु सत्ताधारी त्यातून काही बोध घेत नाहीत. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत. २१ मार्च रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपत आहे. या पार्श्वभूमिवर कार्यकाळ संपण्याआधी पुरस्कार वितरण करण्यात आले. दरवर्षी पुरस्कार मिळणाऱ्यांची यादी मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढत आहे. या वेळी २५३ जणांना पुरस्कार देण्यात आले. दोन वर्षांचे पुरस्कार असल्यामुळे ही संख्या वाढली, असे सांगण्यात आले.

रायगड भूषणसारख्या मानाच्या पुरस्कारांचे निकष हा नेहमीच संशोधनाचा विषय राहिला आहे. आपल्या मर्जीतील लोकांना पुरस्कार देण्याची परंपरा पुर्वीपासून आहे. त्यामुळे पुरस्कारासाठी नावे वाढतात. (ही संख्या मर्यादितच असली पाहिजे) बरं, ही संख्या वाढली, ठिक आहे. परंतु ज्यांना पुरस्कार दिले जाणार आहेत, त्यांच्या चारित्र्याची तरी पडताळणी करून घ्या.

रायगड भूषण हा जिल्ह्यात प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार आहे. महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांना हा पुरस्कार प्रदान करून सन्मानीत करण्यात आले होते. परंतु त्याची रया जिल्हा परिषदेने घालवली आहे. यापूर्वीही सत्ताधारी रायगड भूषण पुरस्कारांची खिरापत वाटत असल्याचा आरोप होत आला आहे. त्यातून काहीतरी शिकायला हवे होते. पण तसे न होता पुरस्कार प्राप्त व्यक्तींची नावे वाढतच आहेत.

रायगड भूषणसारख्या मानाच्या पुरस्कारांचे निकष काय असावेत, यावर अनेकदा चर्चा झाली. पुरस्कार प्राप्त लोकांची संख्या कमी करा, कार्यक्षेत्रानिहाय व्यक्तींची निवड करा, प्रत्येक क्षेत्रासाठी एकाच व्यक्तीची निवड करा, ज्या व्यक्तींनी प्रस्ताव पाठवले आहेत त्यांना गुण देऊन पुरस्कारासाठी निवड करा, रायगड भूषण पुरस्कार निवडण्यासाठी एक समिती नेमा अशा सूचना करण्यात आल्या होत्या. रायगड भूषण पुरस्काराची निवड करण्यासाठी एक समिति नेमण्याचे जिल्हा परिषदेनेही ठरविले होते. समिती नेमण्यात आली होती. त्या समितीचे काय झाले?

यंदा समाजसेवा ६७, पत्रकारिता नऊ, हभप ४६, कला सांस्कृतीक ४९, क्रीडा ४३, वकील एक, गिर्यारोहण एक, डॉक्टर चार, विशेष प्राविण्य दोन अशी पुरस्कारसाठी निवड करण्यात आली. अलिबाग तालुक्यातील ३७, पेण ४२, पनवेल ३८, कर्जत १६, सुधागड पाच, पालादपूर १२, माणगाव १६, म्हसळा १६, महाड २१, तळा चार, श्रीवर्धन तीन, मुरूड तीन, रोहा आठ, उरण १९, खालापूर तालुक्यातील चार अशी निवड करण्यात आली आहे. यातही अलिबाग, पेण व पनवेल या तालुक्यांना झुकते माप देण्यात आले आहे. पुरस्कार दोन वर्षाचे होते तर मुरूडमध्ये दोन वर्षात केवळ तीनच लोक सापडले? प्रत्येक तालुक्याला किती पुरस्कार द्यायचे हेदेखील निश्चित नाही. कोणत्या कार्यक्षेत्रात किती पुरस्कार द्यायचे हे ठरवले नाही. पत्रकारिता क्षेत्रात नऊ जणांची निवड करण्यात आली, त्याला कोणते निकष लावले हेच समजत नाही.

रायगड भूषण हा जिल्ह्याचा प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. त्यासाठी निकष ठरवलेच पाहिजेत. आला प्रस्ताव, द्या पुरस्कार असे होता कामा नये. काहीवेळा संख्या मर्यादित राखता येत नाही, हे मान्य आहे परंतु ज्या व्यक्तींची रायगड भूषण पुरस्कारासाठी निवड केली जातेय, त्यांच्या चारित्र्याची तरी पडताळणी करणार की नाही? कोणी येतो, प्रस्ताव पाठवतो. त्याला पुरस्कार दिला जातो, हे योग्य नाही. यंदा ज्यांना पुरस्कार देण्यात आले आहेत, त्यापैकी काहींवर गुन्हे दाखल आहेत, अशी चर्चा सुरु आहे. जर हे खरं असेल तर दुर्दैव आहे. ज्यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविले गेले आहेत, त्यांनादेखील रायगड भूषण दिला जात असेल तर या पुरस्काराला काय किंमत? ज्यांना पुरस्कार हवाय, त्यांनी पोलिसांनी दिलेला चारित्र्याचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य करा.

# ठाणे जिल्ह्यातील व्यक्तीला 'रायगड भूषण'

## २५७ पुरस्कारांची खैरात वाटणाऱ्या जिल्हा परिषदेचा प्रताप

**कर्जत : बातमीदार**

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तब्बल २५७ व्यक्तींना 'रायगड भूषण' ने सन्मानित करणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेवर चोहोबाजूंनी टीका होत आहे. त्यातच ठाणे जिल्ह्यातील व्यक्तीला रायगड भूषण पुरस्कार देण्याचा पराक्रम रायगड जिल्हा परिषदेने केला आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मात्र राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.




रायगड जिल्ह्याच्या जडणघडणीत मोठे योगदान असलेल्या ठराविक व्यक्तींना जिल्हा परिषदेकडून रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. मात्र यावर्षी (दि. ६ मार्च) तब्बल २५७ व्यक्तींना 'रायगड भूषण' ने सन्मानित करण्यात आले. रायगड भूषणची ही खैरात पाहून सोशल मीडिया आणि प्रसार माध्यमे यांनी रायगड जिल्हा परिषदेवर जोरदार टीका केली होती. त्यातच ठाणे जिल्ह्यातील नामदेव बैकर यांना रायगड भूषण पुरस्कार देऊन रायगड जिल्हा परिषदेने गोंधळ उडवून दिला आहे.

नामदेव बैकर हे वांगणी जवळील ढवळेपाडा (ता. अंबरनाथ, जि. ठाणे) येथील मूळ रहिवासी असून सध्या त्यांचे वास्तव्य बदलापूर नगर परिषद हद्दीमधील खरवई येथे आहे. ते ज्ञानकमळ शिक्षण संस्था (वांगणी, जि. ठाणे) या संस्थेचे सचिव आहेत. त्यांना 'रायगड भूषण' जाहीर करताना पुरस्कार गठन समितीने त्यांच्या पत्याबद्दल काही आक्षेप घेतला नाही काय? या पुरस्कारासाठी स्टॅम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र द्यायचे असते, त्यात नामदेव बैकर कोणत्या जिल्ह्यातील आहेत? याची खात्री रायगड जि.प. पुरस्कार समितीने केली नाही काय?, बैकर हे शिक्षण संस्था चालक असून शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांच्या शिक्षक संघटनेचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे त्यांना रायगड जिल्ह्यातील व्यक्तीसाठी दिला जाणारा रायगड भूषण पुरस्कार देण्यात आला आहे काय? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



(छाया : सलीम शेख)

# माणगावात भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष

**माणगाव : प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशसह पाच राज्यांच्या निवडणूक निकालांमध्ये सरशी झाल्यामुळे माणगावात भाजप कार्यकर्त्यांनी तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्यालयात पेढे वाटून फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष केला.

पाचही राज्यांच्या निवडणुकीचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. त्यात उत्तरप्रदेश, मणिपूर, उत्तराखंडमध्ये भाजपला सत्ता स्थापनेची संधी मिळाली आहे. गोव्यामध्येही भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. निकाल जाहीर होताच माणगाव तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी पेढे वाटले तसेच फटक्यांची आतषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे, उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण, महिला मोर्चा तालुकाध्यक्षा शर्मिला सत्वे, यशोधरा गोडबोले, नीलम काळे, नगरपंचायतीचे स्वच्छता सभापती राजेश मेहता, माजी उपसरपंच नितीन दसवते, युवामोर्चा जिल्हा उपाध्यक्ष चिन्मय मोने, तालुकाध्यक्ष विशाल गलांडे, खजिनदार संजय जाधव, विकास पवार, रमेश शिंदे, कृष्णा भोसले, दहिवली कोंड ग्रामपंचायत सदस्य योगेश पालकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तहसीलदार कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत नागरी संरक्षण दलाचे कुरकुटे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे उद्घाटन निवासी नायब तहसीलदार संजीव मांडे यांनी केले. यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या किर्तीबाबत भाष्य केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी, महाविद्यालात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांचा मागोवा घेतला. कार्यशाळेत कुरकुटे यांनी दोरी, गाठी, झोळीचे प्रकार, जखमींसाठीची प्रथमोपचार पद्धती याबाबत उपस्थितांचा सहभाग घेऊन प्रात्याक्षिके सादर केली.



**सीकेटी महाविद्यालयाच्या मतदार जागरूकता मोहिमेतील यशस्वी सहभागाबद्दल रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने पनवेल महानगरपालिका उपायुक्त विठ्ठल डाके यांनी महाविद्यालयास प्रशंसापत्र प्रदान केले.**

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी स्ट्रेचरचे प्रकार, त्यांचे उपयोजन याबाबत मार्गदर्शन केले. याबरोबरच पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त (मुख्यालय) विठ्ठल डाके यांनी, महिला सक्षमीकरण व मतदार जागरूकता याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे, प्रा. सत्यजित कांबळे, डॉ. योजना मुनिव, प्रा. सागर खैरनार, प्रा. अपूर्वा ढगे, प्रा. आकाश पाटील तसेच तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यशाळेच्या आयोजनासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# सुकापूरमध्ये रंगला खेळ पैठणीचा







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष सुकापूरच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त हळदी- कुंकू समारंभाचे आयोजन मंगळवारी (दि. ८) करण्यात आले होते.

या कार्यक्रमाअंतर्गत 'रंगला खेळ पैठणीचा' तसेच मुकेश उपाध्याय प्रस्तुत सांस्कृतिक कार्यक्रम आणि रायगड जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांचा अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून त्यांनी अमित जाधव यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवासाच्या शुभेच्छा दिल्या.


या सोहळ्याला सुकापूर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अशोक पाटील, भाजपचे पाली देवद अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, उपाध्यक्ष आत्माराम पाटील, ज्येष्ठ नेते हनुमंत खुटले, भरत म्हस्कर, रायगड जिल्हा परिषद सदस्या रेश्मा शेळके, सुकापूर सरपंच योगिता भगत, माजी सरपंच निर्मला केणी, भाजप महिला मोर्चा सुकापूर अध्यक्षा प्रतिक्षा म्हस्कर, माजी उपसरपंच मेनका खुटले, सरचिटणीस स्मिता मुकादम, उषा वाघमारे, निकीता पाटील, उज्वला म्हस्कर, सोनाली कदम, सदस्या पुष्पा म्हस्कर, सदस्या अनिता पाटील, सदस्या प्राची जाधव, यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# अनधिकृत गाळ्यांवर महापालिकेची कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल येथील बंदर रोड येथे अनधिकृत गाळ्यांवर महापालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली. या वेळी सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, कनिष्ठ अभियंता वैभव घरत, अतिक्रमण पथक प्रमुख व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

पनवेलमधील बंदर रोडवरील गाळेधारकांनी अनधिकृतरित्या पोटमाळे तयार केले होते. ब्रेकर, गॅस् कटरच्या साहाय्याने ही तोडक कारवाई करण्यात आली. आयुक्त गणेश देशमुख यांनी दिलेल्या निर्देशांनुसार सध्या पनवेल कार्यक्षेत्रातील अनधिकृत होर्डिंग्जवर मोठी कारवाई सुरू आहे. तसेच अनधिकृत बांधकामांवरही हातोडा चालविला जात आहे. यापुढे असे अनधिकृत बांधकाम आढळल्यास त्यावरती महापालिकेच्यावतीने कारवाई करण्यात येणार आहे.



कोणतेही बांधकाम करताना महापालिकेची परवानगी घेऊनच बांधकाम करावे, असे आवाहन उपायुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.

# सुकापूर येथे गोरगरिबांना अन्नदान

## भाजपच्या सरपंच पूनम भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या सुकापूर ग्रामपंचायतीच्या सदस्या पूनम भगत यांचा वाढदिवस गुरुवारी (दि. १०) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. वाढदिवसानिमित्त सिमरन ग्रुप या सामाजिक संस्थेतर्फे सुकापूर येथील गोरगरिबांना अन्नदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत पूनम भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानाजवळील भाजपच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सुकापूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिवेश भगत, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, सिमरन ग्रुप अध्यक्ष प्रमोद भगत, दिपक भगत, शशिकांत भगत, महादेव गडगे, प्रकाश पोपेटा, अ‍ॅड. रविंद्र केणी, ग्रामपंचायत सदस्या कविता पोपेटा, ज्योती केणी, पुष्पा म्हस्कर, माजी सदस्या भारती भगत, शामली भगत, विकास तळेकर, उदय म्हस्कत, सागर भोपी, राम फडके, सयरेश भगत, विवेक पाटील, तौसिक दलवाई, अजय सैनिक, इश्वरी केणी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी पूनम भगत यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

पान ३ वरुन

## अनुसूची – दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :–** मौजे साखर, ता. पोलादपूर येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन

**प्रकल्पकार्याचे वर्णन :–** दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे साखर, तालुका पोलादपूर येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मौजे साखर येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी साखर येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वयंसेवी संस्थामार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :**

दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे साखर, तालुका पोलादपूर येथे दरड कोसळून मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मौजे साखर, ता. पोलादपूर येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी साखर येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वयंसेवी संस्थामार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे. आणि त्यामुळे दरडग्रस्तांना त्याचा लाभ होणार आहे.

## अनुसूची – तीन
### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गाव – साखर तालुका – पोलादपूर जिल्हा – रायगड

| अ.क्र. (१) | सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर/गट नंबर (२) | संपादनाकरिता आवश्यक जमिनीचे आदनाम क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | ५४ब/४ | १.३४.०० |
| २ | ८८/४ | ०.११.०० |
| ३ | ८८/३ब | ०.१२.९१ |
| ४ | ८८/२ | ०.३१.६० |
| ५ | ८८/१ | ०.०१.५० |
| ६ | ९०/९ | ०.१६.०० |
| ७ | ९०/१० | ०.१०.४० |
| ८ | ८७/८ | ०.०४.०० |
| ९ | ८७/९ | ०.०४.०० |
| | **एकूण** | **२.२५.४१** |

## अनुसूची – चार
### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

दरडग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यास त्यांना त्याचा दिलासा मिळणार आहे.

**टिप :–** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उप विभागीय अधिकारी, महाड, उप विभाग महाड, जि. रायगड यांचे व तहसिलदार पोलादपूर, जि. रायगड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

महाड,
दिनांक : १७ जानेवारी २०२२.

**सही/–**
**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
जिल्हाधिकारी, रायगड.

## जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून
### भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रमाणे कलम १९ चे घोषणापत्र

क्रमांक भूसंपादन कात–५/केवनाळे/घोषणापत्र/एस आर ११/२०२१.– ज्याअर्थी, दरडग्रस्तांचे पुनर्वसन या सार्वजनिक प्रयोजनाकरिता मौजे केवनाळे, ता. पोलादपूर, जि. रायगड येथील जमीन संपादीत करावयाची आहे. सदर संपादनासाठी केलेली जमीन उपविभागीय अधिकारी, महाड उपविभाग महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उपविभागीय अधिकारी महाड यांनी अधिसूचना, क्रमांक भूसंपादन/कात–५/केवनाळे/एस आर ११/२०२१, दिनांक २९ डिसेंबर २०२१ अन्वये कलम ११ ची अधिसूचना मराठीमध्ये **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, बुधवार, दिनांक २९ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचनेबाबतचे यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे;

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी रायगड–अलिबाग, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे. याबाबत माझी खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरिता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उपविभागीय अधिकारी महाड, उपविभाग महाड, ता. महाड, जि. रायगड यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी. असे निर्देश देण्यात येत आहे.

## अनुसूची – एक
### जमिनीचे वर्णन

गाव – केवनाळे, तालुका – पोलादपूर, जिल्हा – रायगड

| अ.क्र. (१) | गट/सर्व्हे क्रमांक (२) | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| १ | ५१५ | ०.९७.९२ |
| २ | ५१६ | ०.०९.१० |
| ३ | ५१८ | ०.१६.५१ |
| ४ | ५१९ | ०.०१.३१ |
| ५ | ५२० | ०.३३.२२ |
| ६ | ५२२ | ०.६५.३५ |
| ७ | ४८९ | ०.७४.०७ |
| ८ | ५०६ | ००.२३.८६ |
| ९ | ५०७ | ०.०६.०९ |
| १० | ५०८ | ०.११.०० |
| ११ | ५०९ | ०.०७.०० |
| १२ | ५१० | ०.०७.०० |
| १३ | ५११ | ०.०७.०० |
| १४ | ५१२ | ०.०२.०० |
| १५ | ५१३ | ०.१२.६४ |
| १६ | ५१४ | ०.०१.८४ |
| १७ | ५२१ | ०.०१.०० |
| | **एकूण** | **३.७६.९१** |

## अनुसूची – दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :–** मौजे केवनाळे, ता. पोलादपूर येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन

**प्रकल्पकार्याचे वर्णन :–** दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे केवनाळे, तालुका पोलादपूर येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मोजे केवनाळे येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी केवनाळे येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वंयसेवी संस्था दिनांक मार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :–** दिनांक २२ व २३ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे, दरड कोसळून मौजे केवनाळे, तालुका पोलादपूर येथे दरड कोसळून, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी झालेली आहे त्यामुळे दरडग्रस्तांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

मौजे केवनाळे, ता. पोलादपूर येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी करण्यासाठी केवनाळे येथील खाजगी जमिनी संपादन करून स्वंयसेवी संस्था मार्फत दरडग्रस्तांना घरे व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे. आणि त्यामुळे दरडग्रस्तांना त्याचा लाभ होणार आहे.

## अनुसूची – तीन
### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गाव – केवनाळे, तालुका – पोलादपूर, जिल्हा – रायगड

| अ.क्र. (१) | गट/सर्व्हे क्रमांक (२) | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| १ | ५१५ | ०.९७.९२ |
| २ | ५१६ | ०.०९.१० |
| ३ | ५१८ | ०.१६.५१ |
| ४ | ५१९ | ०.०१.३१ |
| ५ | ५२० | ०.३३.२२ |
| ६ | ५२२ | ०.६५.३५ |
| ७ | ४८९ | ०.७४.०७ |
| ८ | ५०६ | ००.२३.८६ |
| ९ | ५०७ | ०.०६.०९ |
| १० | ५०८ | ०.११.०० |
| ११ | ५०९ | ०.०७.०० |
| १२ | ५१० | ०.०७.०० |
| १३ | ५११ | ०.०७.०० |
| १४ | ५१२ | ०.०२.०० |
| १५ | ५१३ | ०.१२.६४ |
| १६ | ५१४ | ०.०१.८४ |
| १७ | ५२१ | ०.०१.०० |
| | **एकूण** | **३.७६.९१** |

## अनुसूची – चार
### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

दरडग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यास त्यांना त्याचा दिलासा मिळणार आहे.

**टीप :–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, महाड, उपविभाग महाड, जि. रायगड यांचे व तहसिलदार पोलादपूर, जि. रायगड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**सही/–**
**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
जिल्हाधिकारी,
रायगड.

महाड,
दिनांक : १७ जानेवारी २०२२.

# सीकेटी महाविद्यालयात 'उड्डाण' महोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या वतीने 'उड्डाण' महोत्सवाचे आयोजन केले जाते. २०२१–२०२२ करिता उड्डाण महोत्सवाचे नवी मुंबई विभागीय यजमानपद जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाने भूषविले. हा महोत्सव ८ ते १० मार्च दरम्यान उत्साहात पार पडला.



उड्डाण महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी (दि. ८) झाले. या वेळी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव तथा आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे प्रभारी संचालक सुधीर पुराणिक, उड्डाण महोत्सवाचे आयोजक प्रो. डॉ. कुणाल जाधव आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या महोत्सवास मुंबई विद्यापीठा अंतर्गत २५ महविद्यालयातील ४०० विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

भित्तीपत्रिका स्पर्धेत प्रथम एच.बी.बी.एड.कॉलेज वाशी, द्वितीय अंजुमन–ई–इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस पनवेल, तृतीय जे. व्ही. एम. डिग्री कॉलेज, ऐरोली यांनी पटकावला.

सर्जनशील लेखनात प्रथम सानपाडा कॉलेज कॉलेज ऑफ कॉमर्स अँड टेक्नोलॉजी, द्वितीय अंजुमन–ई–इस्लाम अकबर पिरबोय कॉलेज ऑफ एजुकेशन वाशी, तृतीय डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ लॉ नेरूळ यांनी मिळवला. लघुपट स्पर्धेत प्रथम अंजुमन–ई–इस्लाम अकबर पिरबोय कॉलेज ऑफ एज्युकेशन वाशी, द्वितीय वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिजनेस मॅनेजमेंट सानपाडा, तृतीय रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स खारघर यांनी पटकावला. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी बेलापूर, द्वितीय जे.व्ही.एम.डिग्री कॉलेज ऐरोली, तृतीय एस.आय.ई.एस.कॉलेज नेरूळ, पोवाडा गायन स्पर्धेत प्रथम डी. जी. तटकरे महाविद्यालय माणगाव, द्वितीय वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिजनेस मॅनेजमेंट सानपाडा, शेतकरी शिक्षण संस्था कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड कॉमर्स घणसोली यांनी मिळवला.

सीकेटी महाविद्यालयाच्या चमूने मुंबई विभागीय उड्डाण महोत्सवात वक्तृत्व, भित्तीपत्रिका आणि पोवाडा गायन स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. उड्डाण महोत्सवासारख्या नावीन्यपूर्ण, विद्यार्थी केंद्रित महोत्सवामाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थ्येचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

# भारत दुसऱ्या टेस्टसाठी सज्ज

## राहुल द्रविड पहिल्यांदाच प्रशिक्षकाच्या भूमिकेत



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

१२ मार्चपासून बंगळुरू येथे होणाऱ्या श्रीलंकेविरुद्ध पिंक बॉल टेस्टसाठी टीम इंडियाने जोरदार तयारी सुरू केली आहे. राहुल द्रविड आणि विक्रम राठोड यांनी बंगळुरू येथे होणाऱ्या टेस्ट सामन्याची तयारी जवळून पाहिली. राहुल द्रविड पहिल्यांदाच टीम इंडियासोबत त्याच्या घरच्या मैदानावर प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसणार आहे.

मोहाली येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात टीम इंडियाने श्रीलंकेचा एक डाव आणि २२२ धावांनी पराभव केला. बंगळुरुच्या मैदानात रंगणाऱ्या दुसऱ्या टेस्टमध्येही याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याच्या इराद्याने टीम इंडिया मैदानात उतरेल. टीम इंडियासाठी होणारी ही तिसरी पिंक बॉल टेस्ट असून त्याआधी नोव्हेंबर २०१९ मध्ये कोलकाता येथे बांगलादेश विरुद्ध आणि मार्च २०२१ मध्ये इंग्लंड विरुद्ध टीम इंडियाने भारतात डे-नाइट टेस्ट सामने खेळले आहेत.

दुसऱ्या टेस्टपूर्वी टीम इंडियाने संघात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. संघ व्यवस्थापनाने कुलदीप यादवच्या जागी अक्षर पटेलचा दुसऱ्या कसोटीसाठी संघात समावेश केला आहे. अक्षर आता पूर्णपणे तंदुरुस्त झाला असून दुसऱ्या कसोटीत तो जयंत यादवच्या जागी खेळताना दिसणार आहे. विराट कोहलीसाठी ही टेस्ट महत्त्वाची ठरणार आहे. विराटकडून त्याच्या ७१व्या शतकाची दीर्घकाळ अपेक्षा आहे. जवळपास २७ महिन्यापूर्वी विराटच्या बॅटने शतक झळकावले होते. विराटने शेवटचे शतक बांगलादेशविरुद्ध डे-नाईट कसोटीत केले होते.

दुसऱ्या टेस्टच्या तयारीदरम्यान सर्व खेळाडूही हलक्याफुलक्या वातावरणात सराव करताना दिसले. पहिल्या कसोटीत मयंक अग्रवालला संधी मिळाल्याने दुसऱ्या कसोटीतही मयंक रोहितसोबत डावाची सुरुवात करताना दिसणार आहे.

## क्रिकेट स्पर्धेत पोयनाड संघ विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

पोयनाड विभाग टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने पोयनाड येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेत झुंझार युवक मंडळ पोयनाडचा क्रिकेट संघ अंतिम विजयी संघ ठरला आहे. पोयनाड संघाने घरच्या मैदानावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत अटीतटीच्या अंतिम सामन्यात जय गणेश आंबेवाडी संघावर मात करीत कै. प्रकाश मालोजी चवरकर स्मृतिचषक जिंकला.

तृतीय क्रमांक बीसीसी तीनविरा, तर चतुर्थ क्रमांक मरीआई लेभी संघाने पटकाविला. विजेत्यांना रोख रक्कम व चषक असे पारितोषिक देण्यात आले. संपूर्ण स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळ करणारा अष्टपैलू खेळाडू विनोद पाटील (तीनविरा) याला मालिकवीर, अंतिम लढतीचा सामनावीर विशाल निषाद (पोयनाड), उत्कृष्ट फलंदाज चिराग पाटील (लेभी), उत्कृष्ट गोलंदाज जयेश पाटील (आंबेवाडी) यांनाही गौरविण्यात आले.

### आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धा

## झुलन गोस्वामीने रचला आणखी एक इतिहास

**न्यूझीलंड : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामीने तिच्या कारकिर्दीत आणखी एक नवीन टप्पा गाठला त्यांचबरोबर इतिहास रचला आहे. आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत तिने हा विक्रम केला आहे. झुलन तिच्या कारकिर्दीतील शेवटचा विश्वचषक खेळत आहे.

३९ वर्षीय झुलन गोस्वामी विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक बळी घेणारी पहिली खेळाडू बनली आहे. झुलनने वर्ल्ड कपमध्ये आतापर्यंत ३९ विकेट घेतल्या आहेत. या बाबतीत त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू लिन फुलस्टोनची बरोबरी केली आहे.



झुलनने ३० सामन्यांमध्ये हा पराक्रम केला, तर लिनने केवळ २० सामन्यांमध्ये ही विकेट पराक्रम केला होता.

न्यूझीलंडच्या भूमीवर खेळल्या जात असलेल्या आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत झुलन गोस्वामीने ही कामगिरी केली. यजमान संघ न्यूझीलंडविरुद्ध सामना खेळण्यासाठी आली होती. याच सामन्यात त्याने डावाच्या शेवटच्या षटकात विकेट घेत हा पराक्रम केला. झुलनने कॅटी मार्टिनचा ३९ वा बळी बनवला. सामन्यात झुलन गोस्वामीने ९ षटकात ४१ धावा देत एक विकेट घेतली. झुलनने आपल्या कारकिर्दीत १२ कसोटी, १९७ वनडे आणि ६८ टी-२० सामने खेळले आहेत.

## रवींद्र जडेजाने पटकावले सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंच्या यादी स्थान

**दुबई : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार अष्टपैलू रवींद्र जडेजाने आयसीसीच्या कसोटी क्रमवारीत चमकदार झेप घेताना अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थान पटकावले. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत नाबाद दीडशतकासह सामन्यात एकूण ९ बळी घेत जडेजाने सामनावीर पुरस्कार पटकावला होता.

आयसीसीने म्हटले की, ‘रवींद्र जडेजाने श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत शानदार कामगिरी केली. या जोरावर तो आयसीसी पुरुष खेळाडूंच्या कसोटी अष्टपैलू क्रमवारीत अव्वल स्थानी आला आहे.’ जडेजाने नाबाद १७५ धावांची दमदार खेळी केली होती. या जोरावर त्याने फलंदाजी क्रमवारीत १७ स्थानांची झेप घेत ३७ वे स्थान पटकावले. त्याने गोलंदाजीत ९ बळी घेतले आणि या जोरावर तो १७ व्या स्थानी आला. फलंदाजी आणि गोलंदाजीत केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर जडेजाने वेस्ट इंडिजच्या जेसन होल्डरला मागे टाकत अव्वल स्थानी कब्जा केला. होल्डर फेब्रुवारी २०२१ पासून अव्वल स्थानी विराजमान होता.

## मुरूडमधील क्रिकेट स्पर्धेत भोगेश्वर पाखडी सिद्धिविनायक संघ अव्वल

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड जुनीपेठ येथील शिवशक्ती क्रिडा मंडळाच्या वतीने क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मुरूड भोगेश्वर पाखाडी सिद्धिविनायक संघाने बाजी मारली, तर शेगवाड्यातील आर्यन संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेत शहरी व ग्रामीण भागातून मिळूण एकूण २८ संघांनी सहभाग घेतला होता. या वेळी माजी नगरसेवक गिरीश साळी, सामाजिक कार्यकर्ते विकास भाटकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, श्रीराम जामकर, रूपेश जामकर, मंदार कोलवणकर, ऋषि पोतदार, श्रीकांत मिठाग्री, ओंकार पोतदार, ओंकार चोडणेकर, संदीप पोतदार, सचिन कोलवणकर, रूपेश भाटकर, जयेश चोडणेकर, गणेश पोतदार, महेंद्र मुनेकर, दिलीप जामकर, अनंत खेडेकर, सचिन करंदेकर, बंटी पानकर, सौरभ तेलंगे, विशाल कोलवणकर, प्रथमेश पानकर, सिद्धेश कोलवणकर अंकेश कोलवणकर, प्रकाश चव्हाण, मोहन करंदेकर, तेजस तेलंगे, ओमकार तेलंगे, आदित्य तेलंगे, ऋषिकेश कोलवणकर, आदित्य वाडकर, दिपेश टक्के आदी उपस्थित होते.

विजेत्यांना रोख रक्कम व चषक असे बक्षीस देण्यात आले, तर प्रत्येक सहभागी संघाला पदक व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

सर्वसाधारणपणे दिवाळीनंतर थंडीच्या मोसमात रायगड जिल्ह्यात क्रिकेटच्या स्पर्धा होतात. त्याच जानेवारीपर्यंत चालतात, पण यंदा मार्च सुरू झाला तरीही स्पर्धा होत असल्याचे दिसून येत आहे.

## निवृत्तीची घोषणा करताना श्रीसंत झाला भावनिक

**मुंबई : प्रतिनिधी**

एस. श्रीसंतने भारतीय क्रिकेट संघाला दोनदा विश्वविजेता बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पण मॅच फिक्सिंगमुळे त्याच्यावर बंदी घालण्यात आली. बंदी उठल्यानंतर पुन्हा एकदा तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये परतला आणि त्याने टीम इंडियातही पुनरागमन दाखविण्याचा आशेचा किरण त्याच्या चाहत्यांना दाखवला. पण सलग दोन आयपीएल लिलावात दुर्लक्ष आणि वृद्धत्व यामुळे त्याच्या कारकिर्दीला ब्रेक लागला. श्रीसंतने बुधवारी (दि. ९) सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. श्रीसंतने आधी एकामागून एक ट्विट केले आणि नंतर लाइव्ह येऊन ही दुःखद बातमी चाहत्यांसोबत शेअर केली.

निवृत्तीची घोषणा करताना श्रीसंत खूप भावूक दिसत होता. श्रीसंतच्या डोळ्यांत दिसत होते की त्याला अजूनही खेळायचे आहे पण परिस्थितीमुळे त्याला निवृत्ती घ्यावी लागली. त्याने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये त्याचे डोळे भरून आले होते पण त्याने डोळ्यातून अश्रू येऊ दिले नाहीत.

ही बातमी ऐकून ३९ वर्षीय श्रीसंतने त्याच्या करोडो चाहत्यांना नक्कीच रडवले आहे. निवृत्तीपूर्वी तो देशांतर्गत रणजी स्पर्धेत खेळताना दिसला होता. अशा परिस्थितीत तो अजूनही हार मानणार नाही आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी अपेक्षा होती, परंतु तसे झाले नाही आणि आणखी एका स्टार खेळाडूने भारतीय क्रिकेटला अलविदा केला.

## रवींद्र जडेजाने पटकावले सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंच्या यादी स्थान

**दुबई :** भारताचा स्टार अष्टपैलू रवींद्र जडेजाने आयसीसीच्या कसोटी क्रमवारीत चमकदार झेप घेताना अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थान पटकावले. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत नाबाद दीडशतकासह सामन्यात एकूण ९ बळी घेत जडेजाने सामनावीर पुरस्कार पटकावला होता.

आयसीसीने म्हटले की, ‘रवींद्र जडेजाने श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत शानदार कामगिरी केली. या जोरावर तो आयसीसी पुरुष खेळाडूंच्या कसोटी अष्टपैलू क्रमवारीत अव्वल स्थानी आला आहे.’ जडेजाने नाबाद १७५ धावांची दमदार खेळी केली होती. या जोरावर त्याने फलंदाजी क्रमवारीत १७ स्थानांची झेप घेत ३७वे स्थान पटकावले.






पनवेल : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त तालुका व शहर भाजपच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह कार्यकर्त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली.



मुंबई : महाराष्ट्र राज्य पावर लिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभादेवी येथे नुकतीच राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धा झाली. महाराष्ट्र असंख्य व्यायामपटूंनी सहभाग दर्शवत आपापली खेळी दाखवली. या स्पर्धेत खालापूर तालुक्यातील घोडीवली गावातील युवा तरुण कुणाल पिंगळे याने ५३ किलो वजनी गटात महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला आहे.






पनवेल : भाजप नवीन शेवा यांच्या वतीने आणि टीआयपीएल पुरस्कृत ‘कमळ चषक २०२२’ क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. ही लेदर क्रिकेट स्पर्धा नवीन शेवा मैदानात १० दिवस रंगणार आहे. या क्रिकेट स्पर्धेचे महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन झाले. या वेळी भाजपचे रायगड जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, उरण तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, नवीन शेवा भाजप अध्यक्ष मयुर म्हात्रे आदी उपस्थित होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com